महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर**
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.:विकाछसं/शिक्षण/२०२५/ 523 दिनांक : 13 FEB 2025

प्रति,
प्राचार्य,
या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्था.

**विषय :- भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपुर्ती निमित्त "संविधान गौरव महोत्सव" अंतर्गत तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांमध्ये फेब्रुवारी २०२५ मध्ये संपुर्ण महिनाभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत.**

संदर्भ :- मा. संचालक, तंत्रशिक्षण यांचे परिपत्रक क्र.१/तंशिस/२०२५/२२ दि. १०.०२.२०२५

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये मा. संचालक, तंत्रशिक्षण यांनी भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपुर्ती निमित्त संविधान गौरव महोत्सव अंतर्गत तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांमध्ये फेब्रुवारी २०२५ मध्ये संपुर्ण महिनाभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत कळविलेले आहे. त्यानुसार संदर्भिय पत्रात मुद्दा क्रमांक ०२ मध्ये नमुद केल्यानुसार विविध स्पर्धांचे संस्थास्तरावर आयोजन करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयाच्या ईमेल आयडीवर पीडीएफ स्वरूपातच तसेच कलर प्रिंटसह ०३ प्रतीत या कार्यालयास सादर करण्यात यावा.

13.2.25
(अक्षय ध. जोशी)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई, यांना माहितीस्तव सविनय सादर.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४२९/४९०, ४७७.
ई-मेल-desk9@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक: १/तंशिस/२०२५/२२ दिनांक : १०.०२.२०२५

**महत्वाचे/ कालमर्यादा**

**परिपत्रक**

**विषय :- भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त " संविधान गौरव महोत्सव " अंतर्गत तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांमध्ये फेब्रुवारी, २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन, नमुद करण्यात येते की, दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी भारतीय राज्यघटनेच्या मसुदा स्विकारण्यात आल्याच्या घटनेला दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. दिनांक २६ जानेवारी, १९५० रोजी भारतीय राज्यघटना अंमलात येऊन दिनांक २६ जानेवारी, २०२५ रोजी या ऐतिहासिक घटनेस ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. भारतीय राज्यघटनेने भारताला एक सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक म्हणून स्थापित केले. भारताच्या या ऐतिहासिक परिवर्तनात्मक क्षणाचा सन्मान करण्यासाठी फेब्रुवारी, २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर संविधान गौरव महोत्सव साजरा करणे औचित्याचे ठरेल. या महोत्सवाचा उद्देश राज्यघटनेतील मूलभूत मूल्यांचा पुनरुच्चार करणे आणि नागरिकांना त्यांच्या घटनात्मक अधिकार व कर्तव्यांचे पालन करण्यासाठी प्रेरित करणे हा आहे.

२. त्यानुषंगाने महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमधील विद्यार्थी, शिक्षक, पालक, शहरी/ ग्रामीण / आदिवासी भागातील सर्व सामान्य नागरिक / नागरिकांना भारतीय राज्यघटनेची नव्याने ओळख होणे, नागरी कर्तव्ये व अधिकार या बाबत माहिती व्हावी तसेच राज्यघटनेने दिलेल्या मुलभूत अधिकार व कर्तव्यांची माहिती समाजातील सर्व सामान्यापर्यंत पोहोचविणे या उद्देशाने आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनानुदानित पदवी व पदविका संस्थांमध्ये फेब्रुवारी, २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर संविधान गौरव महोत्सव अंतर्गत खालील उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

- " भारतीय राज्यघटनेची ओळख " या विषयावर निबंध स्पर्धा व वकृत्व स्पर्धाचे आयोजन करणे. भारतीय राज्यघटनेवर प्रश्नमंजुषा आयोजित करणे.
- भारतीय राज्यघटनेसंदर्भात पोस्टर/ भित्तीपत्रके स्पर्धांचे आयोजन करणे.
- राज्य घटनेच्या विविध बाबीं संदर्भात चर्चासत्र, कार्यशाळा, परिषदांचे आयोजन करणे.

- महाविद्यालयांमध्ये राज्य घटनेविषयीचे अभ्यासक, विषयतज्ञ यांना निमंत्रित करून त्यांची व्याख्याने आयोजित करणे.
- राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महाविद्यालयांनी सर्व सामान्यांपर्यंत राज्यघटना पोहोचवावी या करिता जनजागृती अभियान राबविणे.
- राज्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये राज्यघटने विषयी व्याख्याने आयोजित करणे.

३. सर्व विद्यापीठांनी या महोत्सवाअंतर्गत एका नामवंत तज्ञ व्यक्ती / विषयतज्ञ यांना निमंत्रित करुन विद्यापीठ स्तरावर व्यापक स्वरुपात व्याख्यानाचे आयोजन करुन सदर व्याख्यानात विद्यापीठ परिक्षेत्रातील प्राचार्य, अध्यापक, विद्यार्थी, पालक व सर्व सामान्य नागरीक यांनाही निमंत्रित करण्याच्या सुचना उच्च शिक्षण संचालनालयांने विद्यापीठास दिलेल्या असुन सदर व्याख्यान्याच्या ठिकाणी तंत्रशिक्षण संचालनालया अंतर्गत प्राचार्य, अध्यापक, विद्यार्थी, पालक व सर्वसामान्य नागरीक यांनाही उपस्थितीकरिता आमंत्रित करावे.

४. संबंधित विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण यांनी विद्यापीठासमावेत/ सहसंचालक, उच्च शिक्षण विभागीय कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा व सदर व्याख्यान आयोजनाचे नियोजन करावे. तसेच आपल्या अधिनस्त महाविद्यालये / संस्थांना सदर व्याख्यानाच्या दिनांक, वेळ व ठिकाण आपल्या स्तरावरुन कळवावा.

५. उपरोक्त संविधान गौरव महोत्सव अंतर्गत उपक्रमांच्या आयोजनाबाबतचा अहवाल आपल्या स्तरावर एकत्रित करून पीडीएफ स्वरुपात desk१६@dtemaharashtra.gov.in या कार्यासनाच्या इमेल आयडीवर सादर करावी. व हार्डकॉपी स्वरुपात (एकूण ०३ प्रती - कलर प्रिंटस) प्रत्यक्षात सादर करावे.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/ नाशिक/ नागपूर/ अमरावती/छ. संभाजीनगर.

प्रत आवश्यक कारुवाहीकरिता-

सर्व प्राचार्य/ संचालक,
शासकीय/ अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित
तंत्रनिकेतने/ अभियांत्रिकी महाविद्यालये/ औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व तत्सम संस्था.